अति. महापालिका आयुक्त (वि.) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. अतिमआ(वि)/अविवि/213
दिनांक 26/05/2020

## कार्यालयीन परिपत्रक

**विषय :– पुणे महानगरपालिका पुरस्कृत महिला बचत गटांमार्फत कापडी मास्क खरेदी करणेबाबत.**

कोव्हिड–१९ या विषाणूच्या प्रादूर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीवर प्रतिबंधात्मक उपाययोजना पुणे महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहेत. कोव्हिड–१९ चा प्रादूर्भाव रोखणेसाठी सर्व नागरिकांनी मास्क वापरणे आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांकरीता वॉर्डस्तरीय निधीमधून वॉर्डस्तरावर कापडी मास्क खरेदी करणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने पुणे महानगरपालिका पुरस्कृत बचत गटांकडून कापडी मास्क खरेदी करणेची बाब विचाराधीन होती.

मा. महापालिका आयुक्त यांनी ठराव क्र.६/१२२ दि.२७/५/२०२० नुसार पुणे महानगरपालिका पुरस्कृत बचत गटांकडून खालील दराने कापडी मास्क खरेदी करणेस मान्यता दिलेली आहे.

| अ. क्र. | साहित्याचा तपशील | दर रक्कम रू. |
|---|---|---|
| १. | कापडी मास्क डबल लेअर (थ्री प्लाय)<br>१००% कॉटन | १०/–<br>प्रति नग |

पुणे महानगरपालिका कार्यालयांनी आवश्यक कापडी मास्क पुणे महानगरपालिका पुरस्कृत बचत गटांमार्फत रक्कम रू. २ लाखापर्यंत विना निविदा खरेदी करता येईल.

मध्यवर्ती भांडार विभागाकडील कार्यालयीन परिपत्रक क्र.अतिमआ(वि)/भांडार/७६ दि.१२/०६/२०१५ अन्वये महिला बचत गटामार्फत बनविण्यात येणाऱ्या साहित्याचे दर निश्चिती केली असून सदर साहित्य खरेदी करण्या संदर्भात सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर कार्यालयीन परिपत्रकानुसार बचत गटांकडून कापडी मास्क खरेदी करताना पुणे महानगरपालिकेच्या सर्व कार्यालयांनी कार्यवाही करावयाची आहे.

(शान्तनु गोयल)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि.)**
पुणे महानगरपालिका

प्रती,
सर्व संबंधित खातेप्रमुख, पुणे महानगरपालिका

प्रत :
मा. महापालिका आयुक्त
अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल)
यांजकडेस माहितीसाठी....

**(सुनिल इंदलकर)**
**उप आयुक्त**
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका